



# पारनेर दर्शन






वर्ष ३ अंक ११, शनिवार २३ नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# निवडणूक निकालाची उत्सुकता शिगेला!

## १४ टेबलवर होणार मतमोजणी | मतमोजणीच्या २७ फेऱ्या होणार

पारनेर : प्रतिनिधी

**विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीत पारनेर-नगर मतदारसंघातील निकालाची मतदारसंघातील नागरीकांची उत्सुकता शिगेला पोहचली असून प्रत्येक गावाच्या चौका चौकात कोण विजयी होणार यावर गप्पांचा खल सुरू आहे.**

महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके व महायुतीचे उमेदवार काशिनाथ महादू दाते या दोन प्रमुख पक्षाच्या उमेदवारांमध्ये ही लढत होत असून अखेरच्या दोन-तीन दिवसांत दोन्ही उमेदवारांमध्ये मोठी चुरस निर्माण झाल्याने विजयी कोण होणार याबाबत दोन्ही उमेदवारांच्या समर्थकांकडून तर्क वितर्क लढविले जात विजयाचा दावा केला जात आहे. दोन्ही उमेदवारांकडून विजयाचा दावा करण्यात आल्याने सर्वसामान्य जनतेमध्ये कोण विजयी होणार याबाबतची उत्सुकात शिगेला पोहचली आहे.

दोन्ही उमेदवारांकडून विजयाचा दावा केला जात असल्याने दोन्ही उमेदवारांचे समर्थक तणावाखाली आहेत. दरम्यान, मतमोजणीसाठी प्रमुख उमेदवारांसह इतर उमेदवारांकडून मतमोजणी प्रतिनिधींची नेमणूक करण्यासाठी शुक्रवारी लगबग सुरू होती.




### १४ टेबलवर मतमोजणी

**ईव्हीएम मशीनमधील मतमोजणी करण्यासाठी सहाय्यक निवडणूक अधिकारी गायत्री सैंदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली १४ टेबलवर मतमोजणी करण्यात येणार आहे. त्यासाठी १ मतमोजणी पर्यवेक्षक, १सहाय्यक,१ सुक्ष्म निरीक्षक व १ शिपायाची नियुक्ती करण्यात येणार आहे. प्रत्येक टेबलसाठी दोन अतिरिक्त कर्मचारीही नियुक्त करण्यात येणार आहेत.**

### टपाली मतदान

**सात टेबलवर टपाली मतदानाची मोजणी करण्यात येणार आहे. त्यावर सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा तहसिलदार गायत्री सैंदाणे यांचे नियंत्रण असेल. टपाली मतमोजणीसाठी १ पर्यवेक्षक, २ सहाय्यक, १ सुक्ष्म निरीक्षक यांची नियुक्ती करण्यात येणार आहे.**

### स्ट्रॉंग रूमसाठी स्वतंत्र मनुष्यबळ

**मतदान यंत्रे ठेवण्यात आलेल्या स्ट्रॉंग रूमसाठी स्वतंत्र मनुष्यबळ तैनात करण्यात आले असून नायब तहसिलदारांच्या नेतृत्वाखालील पथक त्यावर नियंत्रण ठेवणार आहे. स्ट्रॉंगरूम बाहेर त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असू स्ट्रॉंग रूमजवळ केंद्रीय राखीव पोलीस दल, त्यानंतर राज्य राखीव पोलीस दलाचे जवान तर शेवटी राज्य पोलीस दलाचे जवान पहारा देत आहेत.**

### सेवा मतदारांची मतमोजणी

**सेवा मतदारांच्या मतमोजणीसाठी सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा नगरपंचायतचे मुख्याधिकारी विनय शिपाई यांच्या मार्गदर्शनाखाली चार टेबलवर मतमोजणी करण्यात येणार असून त्यासाठी एका पर्यवेक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे.**

### प्रवेशासाठी ओळखपत्र आवष्यक

**मतमोजणी कक्षामध्ये प्रवेश करण्यासाठी ओळखपत्र बंधनकारक करण्यात आले असून ओळखपत्राशिवाय कोणालाही प्रवेश देण्यात येणार नसल्याचे सांगण्यात आले. मतमोजणी केंद्रामध्ये मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरण्यास मनाई करण्यात आली असून मतमोजणी केंद्रात पेन नेण्यासही मज्ज्ञाव करण्यात आला आहे. मतमोजणी प्रतिनिधींना प्रशासनाच्या वतीने पेन पुरविण्यात येणार आहेत.**

### २७ फेऱ्या

**ईव्हिएम मशिन मधील मतदान मोजण्यासाठी २७ फेऱ्या घेण्यात येणार असून सुरूवातील टपाली मतांची मोजणी केल्यानंतर ईव्हिएम मशिनमधील मतदान मोजण्यास सुरूवात करणार आहे. पारनेर शहरातील सेनापती बापट शासकिय तंत्रनिकेतन केंद्र, अळकुटी रस्ता येथे सकाळी आठ वाजता मतमोजणीस सुरूवात होणार आहे.**

# ईव्हीएम रुमबाहेर उमेदवारांचे प्रतिनिधी पोलिसांच्या वेषात!

## ■ विचारणा करताच उडवाउडवीचे उत्तरं ■ व्हिडिओ व्हायरल

कर्जत: प्रतिनिधी

**कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघात सुरू असलेले वाद आणि आरोप्रत्यारोप मतदानानंतरही थांबलेले नाहीत. आता इव्हीएम ठेवलेल्या स्ट्राँगरुमच्या बाहेर उमेदवारांच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली. काही उमेदवारांचे प्रतिनिधी सुरक्षारक्षकांप्रमाणे कपडे घालून आले होते. त्याला भाजपच्या उमेदवाराच्या प्रतिनिधींनी आक्षेप घेतला. त्यावरून दोघांत बाचाबाची झाली.**



बाचाबाची करणाऱ्या कार्यकर्त्यांविरूद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मात्र, या संघटनेसंबंधी आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियात पोस्ट करून भाजपच्या कार्यकर्त्यांनी मध्यरात्री ईव्हीएम मशीन ठेवलेल्या स्ट्रॉग रुममध्ये घुसण्याचा प्रयत्न केला केल्याचा आरोप केला. यावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण देत कोणीही आत शिरण्याचा प्रयत्न केला नसून स्ट्राँगरुममध्ये ठेवलेली यंत्रे सुरक्षित असल्याचे म्हटले आहे.

यासंबंधी रोहित पवार यांनी म्हटले आहे की, कर्जत जामखेडमध्ये भाजपच्या सुमारे २५-३० कार्यकर्त्यांनी मध्यरात्री ईव्हीएम मशीन ठेवलेल्या स्ट्राँगरुममध्ये घुसण्याचा प्रयत्न केला, परंतु माझे कार्यकर्ते आणि सीआरपीएफच्या जवानांनी संयमाने परिस्थिती हाताळत हा प्रयत्न हाणून पाडला. याबाबत गुन्हा दाखल करताना भाजपच्या दबावाखाली असलेल्या स्थानिक पोलिस प्रशासनाने मात्र सहकार्य करण्याऐवजी त्रास देण्याचीच भूमिका घेतली, याची निवडणूक आयोगाने योग्य ती दखल घ्यावी. भाजप कार्यकर्त्यांचा हा प्रयत्न म्हणजे पराभवाच्या भितीने सुरु असलेली गुंडागर्दी आहे. पण पुढील चोवीस तासातच कर्जत-जामखेडच्या जनतेकडून लोकशाही मार्गाने या गुंडगिरीला चाप बसल्याशिवाय राहणार नाही, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

तर भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस सचिन पोटरे यांनी म्हटले आहे की, आमदार पवार यांनी याबद्दल केलेली पोस्ट खोटी आहे. यामुळे प्रशासनाची, मतदारसंघाची व महाराष्ट्राची दिशाभूल होत आहे. त्याचे असे झाले की, काल रात्री साडेअकरा वाजता भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना माहिती मिळाली की, इव्हीएम ठेवल्याच्या ठिकाणी स्ट्राँगरुम परिसरात बारामती ॲग्रोचे काही कर्मचारी पोलिसांच्या वेशात स्ट्राँगरुमच्या गेटमध्ये व आसपास वावरत आहेत. ते पोलीस कर्मचाऱ्यांसोबत बसले आहेत त्यांच्याकडे अत्याधुनिक मोबाईल व इलेक्ट्रॉनिक यंत्रे आहेत. त्यामुळे भाजपचे पदाधिकारी तेथे पोहचले. सर्वांनी त्या कर्मचाऱ्यांकडे विचारपूस केली असता ते बारामती ॲग्रोचे कर्मचारी असल्याचे निदर्शनास आले. या कर्मचाऱ्यांनी पोलिसांसारखा गणवेश परिधान केला होता.

बारामती ॲग्रोच्या कर्मचाऱ्यांना गेटच्या आता येण्याची व येथे थांबण्याची परवानगी कशी? याचा जाब पोलिसांना विचारला असता भाजपा कार्यकर्त्यावर व इतर ग्रामस्थांवर स्ट्राँगरुममध्ये घुसण्याचा खोटा आरोप आमदार पवार हे सोशल मीडियावर करत आहेत. यासंबंधी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनीही स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी सांगितले की, कर्जत-जामखेड मतदारसघांतील स्ट्राँगरुम परिसरात कोणत्याही व्यक्तीने शिरण्याचा प्रयत्न केला नाही.

निवडणूक आयोगाच्या नियमानुसार सुरक्षा व्यवस्थेवर देखरेख ठेवण्यासाठी उमेदवारांच्या प्रतिनिधींना तेथे थांबता येते. तशी सोय करण्यात आलेली आहे. त्यानुसार रोहित पवार, सतीश डुकरे, राम नारायण शिंदे, शहाजी उबाळे या उमेदवारांचे प्रतिनिधी तेथे बसले होते. त्यांनी परिधान केलेल्या वेषावरून नंतर आलेल्या कार्यकर्त्यांनी वाद घातला. त्यांच्यात बाचाबाची झाली. त्यामुळे पोलिसांनी दोन्ही बाजूंच्या कार्यकर्त्यांविरूद्ध गुन्हे दाखल केले आहेत. हा सर्व प्रकार बाहेर झाला आहे आतमध्ये शिरण्याचा कोणीही प्रयत्न केला नाही, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

---

# महायुतीचे उमेदवारांना ५०-१०० कोटींचे आमिष

## संजय राऊत यांचा मोठा आरोप

मुंबई : प्रतिनिधी

**राज्यामध्ये महाविकास आघाडी किमान १६० जागा जिंकणार असल्याचा दावा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. काल आम्ही प्रत्येक मतदारसंघ निहाय आढावा घेतला. त्यानुसार आम्ही किमान १६० जागा जिंकत असल्याचे लक्षात आले, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. त्यामुळे सर्व्हे ची ऐसी की तैसी असे म्हणत संजय राऊत यांनी एक्झिट पोल मधील केलेले सर्व दावे फेटाळले आहेत.**



ज्या ठिकाणी सत्ता असेल त्या ठिकाणी इतर छोटे मोठे पक्ष एकत्र येत असतात. आमच्या सोबत समाजवादी पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, डाव्या विचारसरणीचे पक्ष आहेत. काही अपक्ष उमेदवारांनी देखील आम्हाला पाठिंबा देण्याची इच्छा व्यक्त केली आहे. सत्ता स्थापन करत असताना आपण सत्तेत सहभागी व्हावे, असे छोट्या पक्षाची इच्छा असते. त्यामुळे सर्वांना सोबत घेणार असल्याचा दावा देखील संजय राऊत यांनी केला.

आतापासूनच देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उमेदवारांना ५०-५०,१००-१०० कोटी रुपयांची ऑफर द्यायला सुरुवात केली आहे. त्यामुळे त्यांना जिंकण्याची खात्री नाही. ज्यांना जिंकण्याची खात्री नसते तेच पैसे द्यायला तयार होतात, असा आरोप देखील राऊत यांनी केला आहे. त्यांना विजयाची अपेक्षा नसती तर त्यांनी पैशांच्या थैल्या पाठवल्या नसत्या, असे म्हणत संजय राऊत यांनी सरकारवर टीका केली.

### मतदानाच्या आकडेवारीवर प्रश्नचिन्ह

मतदानाच्या आकडेवारी मध्ये अचानकपणे वाढ होते. हरियाणामध्ये देखील तसेच झाले होते. त्यामुळे हा काय खेळ आहे? हे निवडणूक आयोगाने आम्हाला समजून सांगायला हवे. अचानक दोन-चार टक्के मतदान कसे वाढते? आणि अचानकपणे भारतीय जनता पक्षाच्या जागा कशा वाढतात? हे आम्हाला निवडणूक आयोगात बसलेल्यांनी समजून सांगावे, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.

# महायुती सत्तेत आल्यास पुन्हा शिंदेच मुख्यमंत्री?



मुंबई : प्रतिनिधी

**विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचे सरकार आल्यास पुन्हा एकदा एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री व्हावेत यासाठी शिवसेना नेत्यांनी जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. त्यातच भाजप नेते मंगलप्रभात लोढा यांनी शिंदे मुख्यमंत्री झाले तर आम्हाला आनंदच होईल असे विधान केल्यामुळे भाजपनेही स्थितीनुसार लवचिक भूमिका घेतल्याचा दावा केला जात आहे. तूर्त मुख्यमंत्रीपदावरून महायुतीत महाविकास आघाडीसारखीच जोरदार रस्सीखेच होण्याची शक्यता आहे.**

विधानसभा निवडणुकीनंतर सर्वच संस्थांचे एक्झिट पोल्स जाहीर झाले. त्यात राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यानुसार सत्ताधारी शिवसेनेच्या नेत्यांनी मुख्यमंत्रीपदासाठी जोरदार लॉबिंग सुरू केली आहे. शिवसेनेचे आमदार तथा प्रवक्ते संजय शिरसाट यांनी यासंबंधी आपल्या पक्षाची जोरकसपणे बाजू मांडली आहे. महायुतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात ही निवडणूक लढली. त्यांच्या चेहऱ्यावर जनतेला मते मागितली. राज्यातील जनतेनेही त्यांच्या चेहऱ्याला पसंती दर्शवली. त्यामुळे मुख्यमंत्रीपदावर त्यांचाच पहिला अधिकार असून, निकालानंतर तेच मुख्यमंत्री होतील अशी आम्हाला खात्री आहे, असे शिरसाट यांनी म्हटले आहे.

**शिंदे सीएम झाले तर आम्हाला आनंदच आहे**

त्यांच्या या विधानावर भाजप नेते तथा मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिली आहे. एकनाथ शिंदे सध्या मुख्यमंत्री आहेत. पण निवडणुकीनंतर महायुतीचे तिन्ही घटकपक्षांचे प्रमुख एकत्र बसून चर्चा करून मुख्यमंत्रीपदाचा निर्णय घेतील. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले तर आम्हाला आनंदच आहे. एवढेच नाही तर त्यांच्या जागी दुसरा एखादा नेता त्या पदावर बसला तरी आम्हाला आनंदच आहे. ही गोष्ट महायुतीच्या तिन्ही पक्षांचे प्रमुख नेते ठरवतील, असे ते म्हणाले.

**शिंदे हेच सरकारचे प्रमुख व्हावेत**

दुसरीकडे, शिवसेना नेते तथा गृहराज्यमंत्री शंभूराज देसाई यांनीही मंगलप्रभात लोढा यांच्या भूमिकेवर आपली प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, महिला, शेतकरी, तरुणांसह सर्वच मतदारांचा प्रतिसाद व एक्झिट पोलचे अंदाज पाहून कुणाचे सरकार येणार हे स्पष्ट झाले आहे. माझ्या मते महायुतीला बहुमतापेक्षा जास्त जागा मिळतील. राहिला प्रश्न सरकारचे नेतृत्व कोण करणार? याचा तर तिन्ही प्रमुख पक्षांचे ज्येष्ठ नेते एकत्र बसून त्यावर निर्णय घेतली. मित्रपक्षांनी देखील ही गोष्ट स्पष्ट केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार एकत्र बसतील व मुख्यमंत्रीपदाचा निर्णय घेतील. शिवसेनेचीही हीच भूमिका आहे. शिवसेना म्हणून किंवा शंभूराज देसाई म्हणून तुम्ही माझे वैयक्तिक मत विचारले, तर मी सांगेन की एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री व्हावेत. आम्हा सर्वांना असे वाटते. शिवसेनेला मुख्यमंत्रीपद भेटले तर आमच्या पक्षाचे प्रमुख एकनाथ शिंदे हेच सरकारचे प्रमुख व्हावेत असे मला वाटते, असे ते म्हणाले.

# शरद पवार महायुतीशी हातमिळवणी करणार

## भाजपा नेते नारायण राणे यांचा दावा | आमदार अन् राज्याच्या हितासाठी पाठिंबा देण्याचा युक्तिवाद

मुंबई : प्रतिनिधी

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल उद्या जाहीर झाल्यानंतर शरद पवार हे महायुती सोबत हातमिळवणी करू शकतात, असा खळखळजनक दावा भाजपचे खासदार नारायण राणे यांनी केला आहे. त्यांच्या पक्षातील आमदारांच्या हितासाठी आणि राज्याच्या हिताच्या निर्णयासाठी शरद पवार कोणत्याही क्षणी महायुतीला पाठिंबा देतील, असे मला वाटते, असे देखील नारायण राणे यांनी म्हटले आहे.**



राज्यामध्ये कोणतेही परिस्थितीत महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होणार नसल्याचा दावा नारायण राणे यांनी केला आहे. शरद पवार हे उद्धव ठाकरे किंवा काँग्रेस सोबत राहणार नाहीत. तर शरद पवार हे महायुती सोबत हातमिळवणी करू शकतात, असा दावा त्यांनी केला. नारायण राणे यांच्या या दाव्यामुळे राज्याच्या राजकारणात चांगलीच खळबळ माजली आहे. शरद पवार यांनी महायुतीसोबत जाण्याचा निर्णय घेतल्यास महाराष्ट्राच्या राजकारणाला पूर्णपणे कलाटणी मिळू शकते. त्यामुळे आता या घटना घडामोडींकडे सर्वांचेच लक्ष लागले आहेत.

यावेळी नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि संजय राऊत यांच्यावर देखील टीका केली. संजय राऊत यांनी शिवसेनेची वाट लावली असून शिवसेनेचे पूर्वीसारखे वर्चस्व राहिले नसल्याचे राणे यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे हे केवळ दोन दिवस मंत्रालयात गेले होते, अशी टीका देखील त्यांनी केली. इतकेच नाही तर विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना रस्त्याने चालणे देखील कठीण होईल, अशा शब्दात राणे यांनी ठाकरे गटावर निशाणा साधला.

राज्यातील विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होण्यासाठी आता अवघे काही तास शिल्लक राहिलेले आहेत. या पार्श्वभूमीवर नारायण राणे यांनी केलेले वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे. शरद पवार हे महाविकास आघाडीची साथ सोडून महायुती सोबत हात मिळवणी करू शकतात, असा दावा त्यांनी केला आहे. तसे झाले तर राज्यातील राजकारणात मोठ्या प्रमाणात बदल होतील, अशी देखील शक्यता वर्तवली जात आहे.

संग्रहित छायाचित्र

फॅशन|संसार|सौंदर्य
सखी

# थंडीत केसांची अशी घ्या काळजी

**हिवाळा सर्वांनाच खूप आवडतो. पण हिवाळ्यात केस त्वचेच्या समस्या निर्माण होतात. या काळात कोंडा केस गळण्याचे प्रमाण मोठ्याप्रमाणात होते. पण काही गोष्टींचा वापर करून तुम्ही केसांची काळजी घेऊ शकता. यासाठी ऋजुता दिवेकरांनी काही उपाय सांगितले आहेत.**

सुंदर दिसण्यासाठी केस मोठी भूमिका बजावतात. पण केस लांब असोत की लहान, त्यांची काळजी घेणे खूप गरजेचे असते. हिवाळ्यात केस धुणे आणि कोरडे करणे थोडे कठीण असते. पण बहुतांश महिला केस सुकवण्यासाठी उन्हात बसतात. पण असे केल्याने केस खराब होतात. लक्षात ठेवा की केस धुतल्यानंतर ओले केस विंचरू नयेत. असे केल्यास केस खराब होऊ शकतात. आजकाल अकाली पांढरे होणे या केसांच्या काळजीच्या काही समस्या आहेत. केसांच्या काळजीच्या समस्या सोडवण्यासाठी, सेलिब्रिटी न्यूट्रिशनिस्ट ऋजुता दिवेकर यांनी हिवाळ्यातील खास हेअर ऑइलची रेसिपी शेअर केली आहे. चला तर मग जाणून घेऊयात काय आहेत त्या गोष्टी...

## हर्बल ऑइल कसे बनवावे

- साहित्य : २० जास्वंदाची फुले, ३० कडुलिंबाची पाने, ३० कढीपत्ता, ५ लहान कांदे, १ टीस्पून मेथी दाणे, १ पान कोरफड, १५-२० जास्मीन फुले, १ लिटर खोबरेल तेल.
- पद्धत : एक वाटी पाणी घेऊन त्यात काही मेथी दाणे तासभर भिजत ठेवा. कोरफडीचे पान घ्या आणि त्याचे लहान तुकडे करा. मिक्सर ब्लेंडर घ्या आणि सर्व साहित्य एकत्र बारीक कराया बारीक केलेल्या पेस्टमध्ये एक लिटर शुद्ध खोबरेल तेल घाला. हे मिश्रण स्किटल किंवा पॅनमध्ये घाला आणि मंद आचेवर सुमारे ३० ते ४५ मिनिटे गरम करा. हे मिश्रण थंड होऊ द्या. थंड झाल्यावर, हर्बल तेल एका काचेच्या बाटलीत टाका.

### हर्बल ऑइलचे फायदे

जास्वंद, कडुलिंब, कढीपत्ता आणि कांदे यांसारख्या वनस्पती आणि औषधी वनस्पतींच्या चांगुलपणाने समृद्ध, हे हर्बल तेल पौष्टिक, हायड्रेटिंग आणि मॉइश्चरायझिंग आहे. यामुळे हिवाळ्यात या तेलाचा खूप फायदा होतो.



- आवळा आणि बेलाचे सरबत : हिवाळ्यात निरोगी त्वचा आणि केसांसाठी आवळा आणि बेलाचे सरबत वापरू शकता. आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी असते. हे डोक्यातील कोंडा कमी करण्यास, टाळूमध्ये रक्त परिसंचरण सुधारून केसांच्या वाढीस चालना देण्यास आणि केसांना नैसर्गिकरित्या कंडिशनिंग करण्यास मदत करू शकते. त्यामुळे केसांचे आरोग्य चांगले होण्यास मदत करते.
- लाडू : गव्हाच्या पिठाचे बेसन, तूप आणि सुकामेवा घालून लाडू बनवले जातात. घटकांचे असे वैविध्यपूर्ण मिश्रण तुमच्या त्वचेचे आणि केसांचे पोषण करू शकते आणि थंड हिवाळ्यात तुम्हाला उबदार ठेवण्यास मदत करते. हिवाळ्यात लागणाऱ्या छोट्या भुकेसाठी तुम्ही या लाडूचा वापर करू शकता.
- हंगामी हिरव्या भाज्या : हिवाळ्यात हंगामी हिरव्या भाज्या खाल्ल्याने तुमच्या त्वचेवर आणि केसांवर फायदेशीर परिणाम होऊ शकतात. वजन कमी करण्यासाठी आहारात हिरव्या भाज्या समाविष्ट करण्याचे फायद्याचे ठरते. या काळात पालक, मोहरी, मटार, बीन्स मुळा, फ्लॉवर, कोबी आणि मेथी हिवाळ्यात उपलब्ध असलेल्या काही सर्वात लोकप्रिय हिरव्या भाज्या आहेत. त्यामुळे निरोगी वजन, त्वचा आणि केसांसाठी हिवाळ्यात या हिरव्या भाज्या नियमित खा.
- कढीपत्ता : कढीपत्ता ही अशी गोष्ट आहे जी अन्नाची चव वाढवण्यासाठी विविध दक्षिण भारतीय स्वादिष्ट पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. केवळ तुमच्या चवींसाठीच नाही तर कढीपत्त्याचा वापर तुमच्या केसांसाठीही फायदेशीर ठरू शकतो. अँटिऑक्सिडंट्स आणि प्रथिने सामग्रीने समृद्ध, कढीपत्ता तुमचे केस निरोगी ठेवण्यास मदत करते.

# थंडीत कशी घ्याल त्वचेची काळजी?

**हिवाळा हा खरे तर सुखद ऋतू. पण या दिवसांत तापमान एकदम कमी होऊ लागल्यावर त्वचा आणि ओठ फुटणे, टाचांना भेगा पडणे, केस कोरडे पडणे या गोष्टी होतातच. जशी आपण थंडीपासून बचाव करण्यासाठी उबदार कपडे घालण्याची काळजी घेतो, तशीच त्वचेचीही काळजी घेणे गरजेचे आहे.**



थंडीत त्वचेतला वात वाढतो आणि त्यातील ओलावा, स्निग्धपणा कमी होतो. कोरड्या पडलेल्या त्वचेमुळे दिवसा आणि रात्रीही त्वचेला कंड सुटतो, त्वचेला स्पर्श केल्यावर ती रखरखीत आणि ओबडधोबड लागते. त्वचा आणखीनच कोरडी पडली तर त्याची सालपटे निघू शकतात, खासकरून टाचांना भेगा पडतात, काहींची त्वचा खूप कोरडी आणि कडक होऊन ती खवल्यांसारखी दिसू लागते.

काही जणांमध्ये या दिवसांत त्वचेला येणारी खाज तर इतकी प्रचंड असते, की त्या ठिकाणी खाजवून ओरखडे पडतात आणि रक्तही येते. अशा पद्धतीने खाजवून झालेली जखम दीर्घकाळ रेंगाळणाऱ्या इसबमध्ये परिवर्तित होणे आणि जास्तच त्रासदायक ठरू शकते.

चेहरा थंडीमुळे उलतो. ओठावर आणि ओठाभोवतीही भेगा पडतात. कधी कधी ओठ फुटल्यामुळे खाताना किंवा बोलताना तोंड उघडल्यावर ओठांना चिरा पडून रक्त येते. अशा वेळी आपण नकळत सारखे ओठाला दात लावतो, ओठ ओले करण्यासाठी त्यावरून जीभ फिरवतो. हा उपाय ओठांच्या विरोधातच जातो! तोंडातील लाळेचा 'पीएच' हा 'अल्कलाइन' असतो. शिवाय त्यात काही पाचकरसही असतात. ओठ सतत लाळेच्या संपर्कात आल्याने ते आणखी विसविशीत होतात, आणखी फुटतात.

बोचऱ्या थंडीमुळे चेहऱ्यावर कोरडेपणाचे डाग पडतात. त्वचेवर सतत



मुलतानी मिट्टी लावून ठेवल्यासारखे खेचल्यासारखे वाटते. त्वचेतून स्निग्धता आणि पाणी उडून गेल्यामुळे त्वचेवरून प्रकाश परावर्तित होऊ शकत नाही आणि त्वचा निस्तेज दिसायला लागते. हे सगळे असे होऊ नये म्हणून त्वचेची सातत्याने काळजी घेणे, निगा राखणे गरजेचे आहे.

### काही टिप्स

- आंघोळीसाठी गार पाणी तर नकोच, पण खूप गरम पाणीही वापरू नये. त्याने त्वचा कोरडी पडते. कोमट वा मध्यम तापमानाचे पाणी वापरणे चांगले.
- आंघोळीच्या वेळी किंवा तोंड धुतानाही साबण, फेस वॉश किंवा अगदी बेसन पिठाचाही कमीतकमी वापर करणे बरे. उन्हाळ्यात अनेकांना स्क्रबर आणि शॉवर जेल वापरून आंघोळ करायला आवडते. थंडीत स्क्रबरने त्वचा घासणे नक्कीच टाळावे.
- आंघोळीनंतर टॉवलेने त्वचा खसाखसा पुसू नये. ओलसर त्वचेवरच चांगल्या प्रतीचे मॉइश्चरायझर, चक्क शेंगदाणा तेल लावावे. बाजारात नेहमी मिळणारी मॉइश्चरायझर आपल्या त्वचेस चालतील की नाही अशी शंका असल्यास त्वचारोगतज्ज्ञाचा सल्ला घेऊन त्यांनी सांगितलेली मॉइश्चरायझर किंवा ऑइंटमेंट लावावीत.
- वातानुकूलित यंत्रणेचा वापर कमीतकमी करावा. तासन्तास एसीत बसणे टाळावे.
- आहारात 'ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स' असलेल्या नैसर्गिक पदार्थाचा जरूर वापर करावा. या पदार्थामध्ये मेथीचे दाणे, अक्रोड, जवस, उडीद, राजमा, मासे अशा पदार्थांचा समावेश होतो. तसेच पुरेशा प्रमाणात पाणी पिणेही गरजेचे.

# हिवाळ्यात त्वचेला मॉइश्चरायझेशन गरजेचे

**सुंदर, नितळ त्वचा कोणाला आवडत नाही. जर तुमची त्वचा जन्मतः चांगली नसली म्हणून काय झाले. तुम्ही तुमच्या त्वचेची नीट काळजी घेतली तर तुमची त्वचा ही अगदी छान तजेलदार दिसू शकते. आता थंडीच्या दिवसांना सुरुवात झाली आहे. हिवाळ्यात कोरड्या त्वचेची समस्या निर्माण होऊ नये, यासाठी आपण त्वचेवर मॉइश्चराइझर आणि क्रीम-लोशनचा उपयोग करतो. त्वचेला हायड्रेट ठेवण्याचा उत्तम मार्ग म्हणजे मॉइश्चरायझेशन. हिवाळा हा एक ऋतू असल्यामुळे तुमच्या त्वचेला जास्त हायड्रेशनची गरज असते, त्यामुळे तुमच्या त्वचेसाठी योग्य मॉइश्चरायझर वापरणे चांगले. नैसर्गिक मॉइश्चरायझर वापरणे अधिक फायदेशीर आहे.**


हिवाळ्यामध्ये वाढत्या थंडीमुळे आपली त्वचा कोरडी होऊ लागते आणि त्यामुळे त्वचेमध्ये असलेले तेल कमी होत जाते. त्यामुळे त्वचेवर कोणताही हार्ष साबण वापरल्यावर आपल्या त्वचा अधिक कोरडी होत जाते. त्यामुळे हिवाळ्यात आंघोळ करताना हार्ष साबण वापरू नका. त्याचबरोबर हिवाळ्यात आंघोळीसाठी जास्त गरम पाणी वापरू नका आणि जास्त वेळ पाण्यात राहू नका. हिवाळ्यामध्ये आंघोळ करत असताना शरीराला खूप जास्त घासू नका. आंघोळ झाल्यानंतर त्वचेला मॉइश्चरायस ठेवण्यासाठी ओलसर त्वचेवरच मॉइश्चरायझर किंवा तेल लावावे. हिवाळ्यात सामान्य मॉइश्चरायजर वापरण्याऐवजी ऑइल बेस्ट मॉइश्चरायजर चा वापर करावा. त्वचेला अधिक चांगले बनवण्यासाठी तुम्ही खास रात्री लावण्यासाठी बनवलेले डीप मॉइश्चरायझर देखील वापरू शकता. यामध्ये प्रामुख्याने हात पाय गुडघे चेहरा इत्यादी गोष्टींना मॉइश्चरायज करावे.

- सनस्क्रीन वापरा : हिवाळ्यात तुम्ही जेव्हा बाहेर पडाल तेव्हा मॉइश्चरायझर बरोबरच तुमच्या त्वचेला सनस्क्रीन लावायला विसरू नका. सनस्क्रीन तुमच्या त्वचेची अतिरिक्त सूर्य किरणांपासून सुरक्षा करून त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करते.
- हायड्रेटेड रहा : दररोज ७ ते ८ ग्लास पाणी प्या. चांगले आरोग्यदायी ज्यूस प्या. यामुळे तुमची त्वचा हायड्रेट राहते. याशिवाय आरोग्याशी संबंधित अनेक समस्यांपासून सुटका मिळते. यामुळे तुमची त्वचा मुलायम राहते.



### मॉइश्चरायझर कधीही लावणे का सोडू नये ?

मॉइश्चरायझर्स कोलेजनचे उत्पादन उत्तेजित करतात, ज्यामुळे त्वचा मजबूत आणि सुरकुत्या-मुक्त राहते. तज्ञांच्या मते, मॉइश्चरायझर्स त्वचेला मॉइश्चरायझ करतात आणि बारीक रेषा देखील सुधारतात. म्हणून, जर तुम्हाला सुरकुत्या टाळायच्या असतील आणि वृद्धत्वाची प्रक्रिया कमी करायची असेल तर तुम्ही नेहमी मॉइश्चरायझर वापरावे. डाग त्वचेच्या सर्वात सामान्य समस्यांपैकी एक आहेत. उन्हाळ्यात, ते आर्द्रतेमुळे दिसतात आणि हिवाळ्यात प्रबळ दिसतात. फक्त विश्वसनीय मॉइश्चरायझर लावून तुम्ही तुमची त्वचा हायड्रेट करू शकता आणि डाग कमी करू शकता. मॉइश्चरायझरचे प्राथमिक कार्य म्हणजे कोरडी आणि चपळ त्वचा रोखणे. हे तुमची त्वचा हायड्रेट करून आणि ओलावा लॉक करून हे साध्य करते. जेव्हा ओलावा बंद होतो, तेव्हा तुमची त्वचा चमकते, तुम्हाला एक तरुण देखावा देते. अभ्यासानुसार, मॉइश्चरायझर्स त्वचेची ॲलर्जी होण्याची शक्यता कमी करतात आणि सोरायसिस आणि एक्जिमा सारख्या त्वचेच्या रोगांवर परिणाम करतात.



# त्वचा सतत कोरडी होते?

**हिवाळ्यात आरोग्यासह त्वचेचीही विशेष काळजी घेण्याची गरज असते. या ऋतूमध्ये वातावरणात होणाऱ्या बदलांमुळे त्वचा कोरडी होण्याची शक्यता असते. या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी काही घरगुती उपाय फायदेशीर ठरतात. कोणते आहेत ते उपाय जाणून घ्या**

- नारळाचे तेल : नारळाच्या तेलामध्ये अनेक औषधी गुणधर्म आढळतात, जे कोरड्या त्वचेच्या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी फायदेशीर मानले जाते. कोरड्या त्वचेवर नारळाचे तेल उत्तम मॉइश्चरायजरचे काम करते. यासाठी झोपण्यापूर्वी नारळाच्या तेलाने चेहऱ्याची मालिश करा.
- मध : मध आरोग्यासह त्वचेसाठीही फायदेशीर मानले जाते. ज्यांना त्वचा सतत कोरडी होते, त्वचेतील आद्रता कमी होते त्यांच्यासाठी मध फायदेशीर ठरते. मधाचा वापर केल्याने त्वचा मऊ आणि निरोगी राहते.
- एलोवेरा : एलोवेराही त्वचेसाठी उत्तम मॉइश्चरायझर मानले जाते. अँटीबॅक्टरियल, अँटिसेप्टिक, अँटीऑक्सिडेंट यांसह विटामिन बी १, बी २, बी ६, बी १२ आढळते, जे त्वचेचा कोरडेपणा दुर करण्यासाठी फायदेशीर मानले जाते.

# तेलकट त्वचेची अशी घ्या काळजी

**तेलकट त्वचा असणाऱ्यांचा चेहरा सतत तेलकट दिसतो. या लोकांच्या चेहऱ्याच्या त्वचेतून नैसर्गिकपणे तेल येत असल्याने चेहरा ठराविक काळाने काळवंडल्यासारखा दिसतो. अशा लोकांना थंडीतही आपल्या त्वचेची विशेष काळजी घ्यावी लागते. यासाठी काही सोप्या गोष्टी केल्यास त्वचेचा पोत चांगला राहण्यास मदत होते. पाहूयात काय आहेत हे उपाय...**

- चेहरा दिवसातून दोनदा धुवा : चेहऱ्यावरील तेलकट पदार्थ निघून जाण्यासाठी चेहरा दिवसातून दोन वेळा स्वच्छ पाण्याने धुणे आवश्यक असते. विशेषतः थंडीच्या दिवसात हा तेलकटपणा कमी होतो त्यामुळे त्वचा कोरडी दिसायला लागते. अशावेळी क्रीम असलेले फेसवॉश वापरून चेहरा धुतल्यास त्याचा निश्चितच फायदा होतो.
- तेलकटपणा नसलेले मॉईश्चरायझर वापरा : तेलकट त्वचेसाठी तेलकटपणाचा घटक नसलेले मॉईश्चरायझर वापरल्यास त्याचा फायदा होतो. ज्या मॉईश्चरायझरमध्ये व्हीटॅमिन ई जास्त प्रमाणात असते असे मॉईश्चरायझर वापरावे. यामुळे चेहऱ्यावर तेलकट घटकांची निर्मिती होण्यापासून तुमची सुटका होईल.
- जास्तीत जास्त पाणी प्या : जास्तीत जास्त पाणी पिणे चांगल्या त्वचेसाठी अत्यावश्यक असते. थंडीच्या दिवसात कमी पाणी प्यायले जाते. मात्र त्यामुळे त्वचा त्वचा जास्त कोरडी आणि निस्तेज होते. पण पाण्याचे प्रमाण जास्त ठेवल्यास त्वचा तजेलदार दिसण्यास मदत होते.

# थंडीमध्ये कशी घ्याल आपल्या नाजूक ओठांची काळजी?

**थोडीशी थंडी सुरू झाली तरी ओठांना चिरा पडणे किंवा ओठांच्या त्वचेची साले निघणे, ओठ फाटणे अशा गोष्टींच्या त्रासदायक अनुभवाला कित्येकांना सामोरे जावे लागते. ओठांची काळजी घेण्यासाठी बाजारात अनेक क्रीम, लीप बाम उपलब्ध असतात. पण, अशा कोरड्या किंवा फाटलेल्या ओठांसाठी बरेचसे घरगुती उपायदेखील आहेत. या घरगुती उपायांमुळे तुमचे ओठ नैसर्गिकरीत्या मुलायम राहण्यास मदत होते. ओठांची काळजी घेण्यासाठी तुम्ही घरी अगदी सहजपणे करू शकता असे कोणकोणते उपाय आहेत ते आपण पाहू...**

- मध : मध तुमच्या ओठाला नैसर्गिकरीत्या मुलायम ठेवण्यासाठी मदत करतो. मधाचा पातळ थर तुमच्या ओठांवर लावा आणि काही मिनिटांनंतर तो कोमट पाण्याने धुऊन टाका. त्यामुळे ओठांच्या त्वचेची साले निघणार नाहीत आणि तुमचे ओठ मऊ राहण्यास मदत होईल.
- खोबरेल तेल : खोबऱ्याचे तेल ओठांसाठी खूप फायदेशीर आहे. ओठांना आवश्यक ते पोषण देऊन, ओठांची काळजी घेण्याचे काम खोबरेल तेल करीत असते. खोबरेल तेलाचे एक-दोन थेंब ओठांवर लावल्याने ओठ हायड्रेट होऊन, मऊ होतात. दिवसभरातून तुम्हाला आवश्यकता वाटेल, तेव्हा तुम्ही खोबरेल तेलाचा वापर करू शकता.
- कोरफड : कोरफडीमध्ये अँटीइम्फ्लेमेटरी घटक असतात. सोबत मॉइश्चरायझिंग घटकदेखील



असतात; जे फाटलेल्या वा साले निघालेल्या ओठांची काळजी घेतात. कोरफडीच्या पानांतून काढलेल्या गराचा किंवा दुकानातून आणलेल्या कोरफड लीप बामचा पातळ थर आपल्या ओठांवर लावा. त्याने तुमचे ओठ मऊ राहण्यास मदत होईल.
- काकडी : काकडीमध्ये नैसर्गिकरीत्या भरपूर पाणी असल्याने तुमच्या कोरड्या ओठांसाठी काकडी फार उपयुक्त ठरते. काकडीच्या पातळ चकत्या करून, काही मिनिटांसाठी त्या ओठांवरून फिरवा. हा प्रयोग तुम्ही दिवसातून कितीही वेळा करू शकता.
- गुलाबाच्या पाकळ्या : गुलाबाच्या पाकळ्यांमध्ये नैसर्गिकरीत्या तेलाचा अंश असतो; जो कोरड्या किंवा साले निघालेल्या ओठांसाठी उपयुक्त ठरतो. गुलाबाच्या काही पाकळ्या घेऊन, त्या दूध किंवा ग्लिसरिनमध्ये काही तासांसाठी भिजवून ठेवा. आता या भिजवलेल्या पाकळ्या अगदी बारीक करून, त्याची पेस्ट तयार करा. ही पेस्ट १५ मिनिटांसाठी ओठांवर लावून ठेवा आणि नंतर ओठ धुऊन टाका.
- ग्रीन टी : वापरलेल्या ग्रीन टीच्या बॅग्स ओठांसाठी खूप उपयुक्त असतात. ग्रीन टीमध्ये असलेल्या अँटीऑक्सिडंट्समुळे ओठांची जळजळ होत असल्यास ती शांत होते. ग्रीन टी बनवल्यानंतर त्यातील ग्रीन टीची बॅग बाहेर काढून, ती थंड होऊ द्या. थंड झाल्यानंतर ती बॅग आपल्या ओठांवर काही मिनिटांसाठी लावावी. त्यामुळे ओठांची जळजळ कमी होण्यास मदत होईल.
- जोजोबा तेल : जोजोबा तेल हे ओठांना मॉइश्चराइज्ड ठेवण्यास मदत करते. जोजोबा तेलाचे काही थेंब आपल्या ओठांवर लावल्याने ओठांना मऊपणा येतो. तुम्ही या तेलाचा दिवसातून कितीही वेळा वापर करू शकता.
- पाणी : ओठांना कोरडेपणापासून दूर ठेवण्यासाठी सर्वांत उत्तम उपाय म्हणजे भरपूर पाणी पिणे. शरीरात पाण्याचे योग्य प्रमाण असेल, तर ओठ कोरडे पडणे, ओठांच्या त्वचेची साले निघणे, ओठ फाटणे यांसारख्या समस्या उद्भवणार नाहीत. त्यामुळे पाणी योग्य प्रमाणात पिणे गरजेचे आहे.

## शॉर्ट न्यूज

### पिकअपच्या अपघातात चौघे ठार

■ **अकोले :** मोटारसायकल व पिकअपच्या भीषण अपघातात चौघे ठार झाल्याची घटना देवठाण-सिन्नर रस्त्यावर घडली. मृतांमध्ये धुमाळवाडी व पिंपळगाव नाकविंदा येथील तरुणांचा समावेश आहे.अकोले विधानसभा मतदारसंघ निवडणुकीत मतदानाचा अधिकार बजावून गणेश भिकाजी झोळेकर, सर्वेश संतोष झोळेकर, अनिकेत सुभाष लगड व ज्योती सुभाष झोळेकर हे सिन्नरच्या दिशेने चालले होते. त्यावेळी देवठाण (ता. अकोले) गावाजवळील गायकवाड वस्तीजवळ हे सर्वजण रस्त्याच्या कडेला उभे असताना भरधाव वेगाने आलेल्या एका मालवाहू पिकअपने या चौघांना जोराची धडक दिली. पिकअप गाडीची धडक जोराची बसल्याने गणेश झोळेकर, सर्वेश झोळेकर व अनिकेत लगड या तिघांचा जागीच मृत्यू झाला. तर ज्योती झोळेकर यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

### एमआयडीसीच्या सह्याद्री चौकात राडा

■ **नगर :** अहिल्यानगर एमआयडीसीच्या सह्याद्री चौकात गुरुवारी (ता. २१) रात्री दहा वाजेच्या सुमारास दोन गटांत राडा झाला. यात किरकोळ जाळपोळही झाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस व अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. परिस्थिती तनावपूर्ण शांततेत आहे. पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.घटनास्थळापासून दीड किलोमीटरच्या अंतरावर उद्या (शनिवारी) मतमोजणी प्रक्रिया होत आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन अधिक सतर्क झाले आहे. सह्याद्री चौकात झालेला दोन गटांतील राडा हा वैयक्तिक कारणाने झाल्याचे समजते. पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

### स्ट्राँग रूमला पोलिसांचे कडेकोट संरक्षण

■ **नेवासा :** येथील शासकीय धान्य गोडाऊनच्या स्ट्राँग रूम येथे मतं पेट्या पोहचलेल्या आहेत. त्यानंतर स्ट्राँग रूम सिल करण्यात आले. स्ट्राँग रूम सुरक्षेची जबाबदारी पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांच्यावर आहे. रूमच्या जवळ केंद्रीय राखीव पोलीस दलाचे ३० जवान सुरक्षेसाठी तैनात आहे. सुरक्षेच्या दुसऱ्या लेअरमध्ये गुजरात राज्य राखीव पोलीस बलाचे तैनात आहे. तिसऱ्या लेयर मध्ये जिल्हा पोलीस दलाकडील अधिकारी अंमलदार नियुक्तीस आहेत. सीसीटीव्ही लावण्यात आले आहे. २०० मीटर परिसरामध्ये प्रवेश करण्यास मज्जाव करण्यात आलेला आहे.

■ कलारंग ■


# नसानसात चित्रकला भरलेले कलाशिक्षक



पराशर ऋषींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पारनेर तालुक्यात अनेक विभूती होऊन गेल्या. आहेत आणि होतीलही. स्वातंत्र्यशाहीर कवी गोविंद, सेनापती बापट (स्वातंत्र्य संग्राम), विद्यासागर डॉ. विष्णुमहाराज पारनेरकर (अध्यात्म आणि तत्त्वज्ञान), पंडित बाळासाहेब वाईकर (शास्त्रीय संगीत) इत्यादी नावेच पुरेशी आहेत.

कलेला आकार देतो तो कलाकार, असे शहनाई वादक उस्ताद बिस्मिल्ला खान म्हणत असत. आपल्या तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर गावचे असेच एक कलाकार आहेत. नारायण बाळकृष्ण शेळके. चित्रकला क्षेत्रातील जातीवंत उमदे कलाकार.

नारायण बाळकृष्ण शेळके यांचा जन्म १५ जानेवारी १९७९ रोजी टाकळी ढोकेश्वर (ता. पारनेर, जि. अहमदनगर) येथे झाला.




प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, टाकळी ढोकेश्वर, माध्यमिक शालेय शिक्षण याच गावातील श्री ढोकेश्वर माध्यमिक विद्यालयात झाले. त्यांनी प्रगत कला महाविद्यालय, तारकपूर, अहमदनगर येथून ए.टी.डी. (आर्ट टिचर्स डिप्लोमा), नासिक कला निकेतन, नासिक येथून जी.डी.आर्ट (गव्हर्नमेन्ट डिप्लोमा इन आर्ट एज्युकेशन) आणि अभिनव कला महाविद्यालय, पुणे येथून डी.ए.ई. (डिप्लोमा इन आर्ट एज्युकेशन) पदवी मिळवली.

सध्या ते जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या श्री ढोकेश्वर माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे गेल्या १४ वर्षांपासून विशेष कलाशिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

चित्रकलेची उपजत आवड म्हणून नारायण शेळके हे या कलाक्षेत्राकडे वळले. प्रसिद्ध चित्रकार शिवाजीराव तुपे (नासिक) आणि गणपतराव वडणगेकर (कोल्हापूर) यांच्या चित्रकलेचा आपल्यावर विशेष प्रभाव आहे असे शेळके सर म्हणतात.

आत्तापर्यंत जहांगीर आर्ट गॅलरी, मुंबई, पुणे, दिल्ली, न्यूयार्क, इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया अशा नामांकित ठिकाणी देश विदेशात त्यांची २४ चित्रकला प्रदर्शने भरलेली आहेत.

त्यांना अनेक राज्यस्तरीय आणि राष्ट्रस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. महाराष्ट्र राज्याची चित्रकला क्षेत्रातली स्कॉलरशिपही त्यांना मिळालेली आहे.

अपने जैसी कोई तस्वीर बनानी थी मुझे।
मिरे अंदर से सभी रंग तुम्हारे निकले।।

सालिम सलीम आपल्या उर्दू शेरात म्हणतात, माझ्यासारखे एक चित्र काढायचे होते. पण माझ्यातून सगळे रंग तुझेच निघाले!

या उर्दू शायराने म्हटल्याप्रमाणे नारायण शेळके सर यांच्या नसानसात चित्रकला भरलेली आहे. त्यांच्या कलाविष्कारातून रसिकांना त्याचीच प्रतीती येईल. संबंधित विद्यालयाने, शिक्षण खात्याने आणि रसिक मायबापांनी त्यांच्या कलेला विशेष उत्तेजन दिले पाहिजे. त्यांच्या कलेची खास दखल घेतली पाहिजे. त्यांच्या कलेचा वृक्ष नित्य नवा आणि बहरत राहिला पाहिजे. आपल्या समाजाला ते भूषण आहे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर.**

# राज्यात आम्हीच सत्ता स्थापन करणार आहोत

## आमदार बच्चू कडू यांचा दावा

**मुंबई : प्रतिनिधी**

**देशभराचे लक्ष लागलेली महाराष्ट्राच्या विधानसभेचे मतदान संपल्यानंतर एक्झिट पोलचे निर्णय येण्यास सुरुवात झाली आहे. या एक्झिट पोलचे निर्णय पाहता महायुतीला व महाविकास आघाडीला स्पष्ट बहुमत मिळेल असे वाटत नाहीये. अशा स्थिती राहिल्यास अपक्ष व इतर लहान पक्षांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. सत्तास्थापनेत लहान पक्षांना, अपक्षांना मोठा वाटा मिळू शकतो अशी शक्यता वर्तवली जात आहे. तसे वक्तव्य आमदार बच्चू कडू यांनी केले आहे.**



यावर वक्तव्य करताना प्रहार जनशक्ती पार्टीचे प्रमुख व अचलपूरचे आमदार बच्चू कडू हे म्हणाले की, ''राज्यात आम्हीच सत्ता स्थापन करणार आहोत, हे सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ आहे. बाकीच्यांना आम्हाला पाठिंबा द्यावा लागेल. एक्झिट पोलचे आकडे पाहता कोणाची सत्ता येईल हे सांगता येत नाही. मात्र आमच्याशिवाय सत्ता स्थापन होऊ शकत नाही, हे मी ठामपणे सांगू शकतो''.

राज्यातील महाविकास आघाडी व महायुतीमधून आम्हीच सरकार स्थापन करणार असल्याचे दावे करत आहेत. एक्झिट पोलमधून राज्यात त्रिशंकू परिस्थिती होईल अशी स्थिती आहे. यामुळे नेमके कोणाचे सरकार स्थापन होणार हे शनिवारी (२३ नोव्हेंबर) दुपारनंतर स्पष्ट होणार आहे.

# संकट येण्यापूर्वीच त्याचा सामना करण्याची तयारी करा

■ 'नेतृत्व संवाद' अंतर्गत व्याख्यान
■ डॉ. भरत केळकर यांचे विद्यार्थ्यांना आवाहन



**कोपरगाव : प्रतिनिधी**

**खरे नेतृत्व गुण असणारी व्यक्ती येणाऱ्या संकटांचा वेध घेऊन त्यांच्याशी सामना करून ते येऊच नये यासाठी नियोजन करते. समजा संकट आलेच, तर अशा व्यक्ती संकटांची तिव्रता कमी करू शकतात. यासाठी चांगली मानसिकता हवी असते. मन नकारात्मकतेने भरलेले असल्यास आपण संकटांवर मात करू शकत नाही, संकटांचे प्रभावी निराकरण करण्यासाठी वाटाघाटी कौशल्ये महत्वपूर्ण ठरतात, असे प्रतिपादन आर्थोपेडिक सर्जन डॉ. भरत केळकर यांनी केले.**

संजीवनी विद्यापीठ अंतर्गत स्कूल ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंटच्या वतीने बीबीए, बी. कॉम व एमबीएच्या विद्यार्थ्यांसाठी 'नेतृत्व संवाद' या विषयावर व्याख्यान मालिकेचे आयोजन केले. या मालिकेत डॉ. केळकर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

प्रारंभी संजीवनी ग्रूप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी डॉ. केळकर यांचा सत्कार केला. याप्रसंगी चिफ टेक्निकल ऑफिसर विजय नायडू, डॉ. सतीश अजमेरे, संजीवनी विद्यापीठाच्या प्रो व्हाईस चांसलर डॉ. जे जानेथ, डीन डॉ. कविथा राणी, स्कूल ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंटचे डीन डॉ. विनोद मालकर, बीबीए विभागाचे प्रमुख प्रा. सुधांशू भट्ट आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. केळकर यांनी नेतृत्व, संकट व्यवस्थापन, वाटाघाटी, आदी विषयांना स्पर्श केला.

संजीवनीचे अध्यक्ष नितीन कोल्हे यांनी या उपक्रमाचे कौतूक केले. डॉ. केळकर यांनी सिरिया, येमेन व इराकमधील युध्दांमध्ये स्वयंस्फूर्तीने जखमी जवानांना वैद्यकीय सेवा दिली. या सेवेचे व युध्दाची चित्तथरारक ध्वनीचित्रफित त्यांनी विद्यार्थ्यांना दाखवली. कठीण परीस्थितही तेथे त्यांनी कशी सेवा दिली, याची माहिती दिली.

डॉ. केळकर म्हणाले, नेतृत्व गुण जोपासण्यासाठी प्रत्येकाने दुसऱ्याच्या बोलण्याला प्रतिसाद दिला, तर तो आपला होतो. आपले मन एककल्ली राहूच नये यासाठी मनाची लवचिकता हवी. हा आपला लवचिक स्वभाव तयार करण्यासाठी ध्यानधारणा करावी. संकट अथवा संघर्षाच्या वेळी ध्यानधारणेमुळे मन शांत राहते. प्रभावी संकट व्यवस्थापनाची सुरुवात स्वत:पासून करा. आपण भावनांचे व्यवस्थापन केले पाहिजे. आपल्याला संघटक होऊन नेतृत्व करायचे असेल तर अगदी टोकाच्या प्रसंगातही शब्द जपून वापरावे. केवळ जिंकण्यावर भर न देता शांत राहण्याचा सल्ला त्यांनी दिला. प्रा. सुधांशू भट्ट यांनी आभार मानले.

# विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षकांची नियुक्ती

## पारनेरसाठी सुरेंदर सिंग संपर्क अधिकारी

**नगर : प्रतिनिधी**

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पार पडणार आहे. यासाठी भारत निवडणूक आयोगातर्फे मतमोजणी निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.**

अकोले विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक हौलिनलाल गौईटे, (संपर्क अधिकारी उर्ध्व प्रवरा उपविभाग कार्यकारी अभियंता प्रदिप हापसे), संगमनेरसाठी सुनिल सिंग (संपर्क अधिकारी उर्ध्व प्रवरा उपविभाग कार्यकारी अभियंता कैलास ठाकरे), शिर्डीसाठी कविथा रामू (संपर्क अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे), कोपरगावसाठी शेरी (संपर्क अधिकारी रचना सहायक किरण जोशी), श्रीरामपूर साठी अरूण कुमार (संपर्क अधिकारी मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलम), आणि नेवासा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून जे. एल. बी. हरि प्रिया (संपर्क अधिकारी विस्तार अधिकारी बी.के.कासार), यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून रंजिता (संपर्क अधिकारी मुळा पाटबंधारे कार्यकारी अभियां सायली पाटील व धनश्री शिंदे), राहूरीसाठी केशव हिंगोनिया (संपर्क अधिकारी सहायक प्राध्यापक आर.आर. निरगुडे), पारनेर साठी सुरेंदर सिंग (संपर्क अधिकारी कुकडी पाटबंधारे विभागाचे घोरपडे), अहमदनगर शहरसाठी ताय काये (संपर्क अधिकारी सहायक अभियंता संदिप कुंभार), श्रीगोंदासाठी डी रथ्ना (संपर्क अधिकारी सहायक गटविकास अधिकारी विजय गायकवाड), उपविभागीय अभियंता बबन वाळके, कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून पुजा यादव (संपर्क अधिकारी मुख्याधिकारी अजय साळवे, पुरवठा निरीक्षक वृषाली जाधव, यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती निवडणूक निरीक्षक समन्वयक अधिकारी दीपक दातीर यांनी दिली आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत पत्रकाराचा जागीच मृत्यू

## राहुरी फॅक्टरीच्या वाणीमळा शिवारातील दुर्घटना

**देवळाली प्रवरा : प्रतिनिधी**

**राहुरी फॅक्टरी येथील सूर्यानगर येथील रहिवासी मनोज संतुराम हासे यांचा अज्ञात वाहनाच्या धडकेत जागीच मृत्यू झाल्याची घटना बुधवारी १२ वाजे दरम्यान राहुरी फॅक्टरी येथील वाणी मळा शिवारात नगर-मनमाड मार्गावर घडली. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा असा परिवार आहे.**



पत्रकार मनोज हासे (वय ४२) हे त्यांच्या दुचाकीवरून नगर-मनमाड मार्गावरून जात होते. वाणीमळा पुलावर अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या धडकेत त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होऊन ते जागीच मृत्युमुखी पडले. यावेळी पारनेर येथील विधानसभा निवडणुकीची ड्युटी उरकून गणेगाव येथे घरी जात असलेल्या होमगार्ड चांगदेव कोबरणे, होमगार्ड सतीश कोबरणे यांना हासे हे मृत अवस्थेत दिसून आले. त्यांनी घटनास्थळी रूग्णवाहिका चालक रवी देवगिरे यांना बोलावून मृतदेह शवविच्छेदनासाठी राहुरी येथील ग्रामीण रूग्णालयात पाठवण्यात आला होता.

घटनास्थळी राहुरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजय ठेंगे, पोलिस हेडकॉन्स्टेबल प्रमोद ढाकणे यांनी भेट दिली. दरम्यान, अशोक शिंदे, बाबासाहेब शेळके, प्रवीण बागूल, हॉटेल साई समाधानचे दत्तात्रय दरंदले, राजमुद्रा उद्योग समूहाचे प्रशांत मुसमाडे, पत्रकार श्रीकांत जाधव यांनी मदतकार्य केले. दरम्यान, राहुरी फॅक्टरी येथील अमरधाम मध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते. या घटनेने हळहळ व्यक्त होत आहे.

# भारतीय गोलंदाजांनी उडविली ऑस्ट्रेलियाची भंबेरी!

**पर्थ । वृत्तसंस्था-** भारत आणि ऑस्ट्रेलिया संघातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला पर्थ येथील सामन्यान सुरुवात झाली आहे. या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणारा भारतीय संघ ऑस्ट्रेलियन वेगवान माऱ्यापुढे १५० धावांवर गारद झाला. यानंतर भारतीय गोलंदाजांनी जशात तसे उत्तर दिले, ज्यामुळे ऑस्ट्रेलिया संघ पहिल्या दिवसांचा खेळ संपेपर्यंत पहिल्या डावात सात गडी गमावून ६७ धावा करु शकला. यासह कांगारु संघाच्या नावावर एका लाजिरवाण्या विक्रमाची नोंद झाली आहे.

पर्थ कसोटीच्या पहिल्या दिवसाचा खेळ संपला, तेव्हा ॲलेक्स कॅरी (१९) आणि मिचेल स्टार्क (६) धावांवर परतले. ऑस्ट्रेलियन संघ भारताच्या तुलनेत अजून अजूनही ८३ धावांनी मागे आहे. आतापर्यंत एकाही कांगारू फलंदाजाला २० च्या वर जाता आलेले नाही. भारताकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक चार विकेट् घेतल्या आहेत. त्याचबरोबर मोहम्मद सिराजने २ आणि पदार्पणवीर हर्षित राणाने एक विकेट घेतली.

टीम इंडियाच्या गोलंदाजी सुरूवात होताच, जसप्रीत बुमराहने ऑस्ट्रेलियाच्या टॉप ऑर्डरला खिंडार पाडले. त्याने पहिल्या तीन विकेट्स घेत ऑस्ट्रेलियाच्या डावाला मोठा धक्का दिला. त्यात स्टीव्ह स्मिथला गोल्डन डकवर पॅव्हेलियनमध्ये पाठवण्याचाही समावेश होता. मोहम्मद सिराजला दुसऱ्या टोकाकडून चांगली गोलंदाजी करता आली नाही, त्यामुळे कर्णधाराने हर्षित राणाकडे गोलंदाजी सोपवली. त्याने ट्रॅव्हिस हेडला बाद करून भारतीय संघाला मोठे यश मिळवून दिले. यानंतर दुसऱ्या स्पेलमध्ये सिराज पुन्हा आला, तेव्हा त्याने टिच्चून मारा करताना दोन महत्त्वाच्या विकेट्स घेत ऑस्ट्रेलियन संघाला बॅकफूटवर ढकलले.

### ऑस्ट्रेलियाचा मायदेशात झाला लाजीरवाणा विक्रम

**आकडेवारीबद्दल बोलायचे तर, १९८० नंतर ऑस्ट्रेलियन संघासोबत असे घडण्याची ही दुसरी वेळ आहे, जेव्हा ऑस्ट्रेलियाने मायदेशात कसोटी खेळताना ४० धावांचा आकडा गाठण्यापूर्वी ५ विकेट्स गमावल्या आहेत. यापूर्वी २०१८ मध्ये दक्षिण आफ्रिकेनेही अशीच कामगिरी केली होती. त्या सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाने दक्षिण आफ्रिकेसमोर पूर्णपणे शरणागती पत्करली होती. त्यावेळी होबार्टमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने केवळ १७ धावांवर ५ विकेट गमावल्या होत्या. भारतासमोर ऑस्ट्रेलियाने ३८ धावांत ५ विकेट्स गमावल्या आहेत. दरम्यान, संघाची धावसंख्या ५० धावांपर्यंत पोहोचेपर्यंत त्यांची सहावी विकेट्सही गेली होती.**

# पारनेरसह सात मतदारसंघाची मतमोजणी लांबणार

■ शेवगाव, श्रीगोंदा, कर्जत-जामखेड, राहुरी, अकोले मतदारसंघाचा समावेश
■ मतमोजणीच्या होणार २२ ते २६ फेऱ्या ■ अन्य मतदारसंघांत १९ ते २१ राऊंड

पारनेर : प्रतिनिधी

**विधानसभा निवडणुकीसाठी मतदान झाले असून उद्या शनिवारी जिल्ह्यातील १२ मतदारसंघांची मतमोजणी होणार आहे. साधारण एका मतदारसंघासाठी १०० ते १५० कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून या सर्वांना आज (शुक्रवारी) मतमोजणीचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. दरम्यान, जिल्ह्यात मतदान केंद्राच्या संख्येनूसार मतदानाच्या फेर्या ठरणार असून प्रत्येक ठिकाणी मोजणीसाठी १४ टेबलची व्यवस्था करण्यात आली आहे. एकावेळी १४ टेबलची मोजणी पूर्ण झाल्यावर मोजणीचा एक राऊंड होणार आहे.**



■ मतमोजणी करताना कर्मचारी व उमेदवार प्रतिनिधी ( संग्रहित छायाचित्र)

जिल्ह्यात सर्वाधिक मतमोजणीच्या फेर्या या शेवगाव आणि पारनेर तालुक्यात प्रत्येकी २६ अशा होणार आहेत. तर श्रीगोंदा आणि कर्जत-जामखेड प्रत्येकी २५ फेर्या होणार असून राहुरी, श्रीरामपूर आणि अकोले मतदारसंघात प्रत्येकी २२ फेर्या होणार आहेत. जिल्ह्यात सर्वाधिक मतमोजणीसाठी वेळ या चार मतदारसंघांत लागणार आहे. उर्वरितमध्ये नगर शहरात २१ फेर्या, संगमनेर २१ फेर्या, नेवासा २० फेर्या तर शिर्डी आणि कोपरगाव मतदारसंघात प्रत्येकी १ फेर्या होणार आहेत.

जिल्ह्यात प्रत्येक मतदान केंद्रात मतमोजणीसाठी प्रत्येकी १४ टेबल लावण्यात येणार आहेत. यासह सैनिक व पोस्टल मतांच्या मोजणीसाठी स्वतंत्र टेबल असणार आहेत.

प्रत्येक ठिकाणच्या मतमोजणीसाठी १०० ते १५० कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. या कर्मचार्यांना मोजणीबाबतचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. सकाळी आठ वाजता मतमोजणी सुरू करण्यात येणार असून साधारणपणे दहाव्या फेरीपासून निकालाचा प्राथमिक कल हाती येणार आहे.

### मतमोजणी केंद्राचे ठिकाण मतदारसंघमतमोजणी

अकोले-तहसील कार्यालय नवीन इमारत
संगमनेर भाऊसाहेब संतुजी थोरात क्रीडा संकुल
शिर्डी प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालय, राहाता
कोपरगाव सेवा निकेतन कॉन्व्हेंट स्कूल
श्रीरामपूर मध्यवर्ती प्रशासकीय इमारत तहसील कार्यालय
नेवासा न्यू गव्हर्न्मेंट ग्रेन गोडाऊन, मुकुंदपुरा, नेवासा फाटा
शेवगाव शासकीय इमारत तहसील कार्यालय शेवगाव
राहुरी रामदास पाटील धुमाळ न्यू आर्टस कॉलेज, राहुरी
पारनेर औद्यागिक प्रशिक्षण संस्था, पारनेर
अहमदनगर शहर वेअर हाऊस गोडाऊन एमआयडीसी, नागापूर
श्रीगोंदा गव्हर्न्मेंट ग्रेन गोडाऊन, पेडगाव रोड
कर्जत जामखेड दादा पाटील महाविद्यालय, कर्जत.

### अशी होते मतमोजणी

विधानसभा निवडणुकीची मतमोजणी शनिवारी सकाळी आठ वाजता सुरू होणार आहे. यावेळी प्रत्येक पक्षाचे उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत सकाळी सात वाजता स्ट्राँग रूमचे कुलूप उघडले जाते. यावेळी निवडणूक आयोगाचे निवडणूक अधिकारी आणि विशेष निरीक्षकही उपस्थित असतात. या संपूर्ण प्रक्रियेचा व्हिडीओ शूट केला जातो. त्यानंतर इव्हीएमचे कंट्रोल युनिट मतमोजणी टेबलावर आणले जाते. या प्रक्रियेचे व्हिडीओ शूटिंग केले जाते. तसेच सीसीटीव्हीच्या माध्यमातूनही लक्ष ठेवले जाते. टेबलावर ठेवल्यानंतर प्रत्येक कंट्रोल युनिटचा युनिक आयडी आणि सील जुळतात. प्रत्येक उमेदवाराच्या पोलिंग एजंटलाही ते दाखविले जाते. त्यानंतर कंट्रोल युनिटमधील बटण दाबल्यानंतर प्रत्येक उमेदवाराचे मत त्याच्या नावापुढे इव्हीएममध्ये दिसू लागते.

# संतोष काटे रांध्याचे सरपंच : बिनविरोध निवड

खा. नीलेश लंके यांनी केला सत्कार

रांधे : प्रतिनिधी

**रांधे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी माजी उपसरपंच तथा विद्यमान ग्रामपंचायत सदस्य संतोष काटे यांची बिनविरोध निवड झाली. दिलीप आवारी यांनी राजिनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर काटे यांना संधी देण्यात आली.**



रांधे ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक खासदार नीलेश लंके यांच्या आवाहनास प्रतिसाद देत ग्रामस्थांनी निवडणूक बिनविरोध निवड केली होती. बिनविरोध निवड करताना प्रत्येक सदस्याला संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. बिनविरोध निवडीप्रसंगी ठरलेल्या फॉर्म्युल्यानुसार दिलीप आवारी यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेवर संतोष काटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी विजय आवारी, बाळासाहेब आवारी, वरूण सोनवणे, प्रवीण साबळे, हौशाभाऊ आवारी, रामदास भोसले, अप्पासाहेब काटे, भगवान पावडे, सुरेश सरोदे, साईनाथ झिंजाड, उत्तम गायकवाड, गोरक्ष सरोदे, दत्ता टावरे, विनोद फापाळे,अविनाश आवारी, रामदास शेटे, भारत शिंदे, रोहिणी काटे,ग्रामपंचायत सदस्य अरूण आवारी, रामदास झिंजाड, मा. सरपंच दिलीप आवारी, रेष्मा शेख, उपसरपंच अश्विनी आवारी, सुनिता आवारी, मनिषा भोसले, जयश्री साबळे, बाजीराव आवारी, अशोक आवारी आदी उपस्थित होते.

गेल्या पंधरा वर्षांपासून संतोष काटे हे ग्रामपंचायत, सोसायटीच्या राजकारणात सक्रीय आहेत. विविध राजकीय निर्णयांमध्ये त्यांची महत्वाची भूमिका महत्वाची असते. ग्रामपंचायत निवडणूक बिनविरोध करण्यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला होता.

### लंके यांनी केला सत्कार

संतोष काटे यांची बिनविरोध निवड झाल्यानंतर निघोज येथे पार पडलेल्या प्रचार सभेत संतोष काटे यांचा सत्कार करण्यात आला. संतोष काटे यांच्याकडे अनुभवाची शिदोरी असून ते त्यांच्या पदाला न्याय देतील असा विश्वास खा. नीलेश लंके यांनी यावेळी व्यक्त केला.

### काटे यांच्या पत्नी पंचायत समिती सदस्या

संतोष काटे यांच्या पत्नी रोहिणी काटे यांनी पंचायत समितीच्या सदस्य म्हणून पारनेर पंचायत समितीमध्ये काम केलेले आहे. या पदाच्या माध्यमातून त्यांनी रांधे व पंचायत समितीच्या गणामध्ये भरीव विकास कामे राबविली आहेत.

# नरेंद्र फिरोदिया यांना उद्योगरत्न पुरस्कार जाहीर

२५ जानेवारीला प्रदान सोहळा

पारनेर : प्रतिनिधी



**पारनेर येथील पूर्णवाद लाइफ मॅनेजमेंट संस्थेतर्फे यंदाचा उद्योगरत्न पुरस्कार अहिल्यानगर येथील उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांना जाहीर करण्यात आला आहे.**

दिवंगत डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर यांनी घालून दिलेल्या आदर्शांना अनुसरणाऱ्या पूर्णवाद लाइफ मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट, मुंबई या सामाजिक, आध्यात्मिक समूहातर्फे दरवर्षी पुरस्कार दिले जातात. समूहाच्या मुंबई केंद्राने पारनेरकर महाराज यांच्या स्मरणार्थ अर्थशास्त्र आणि उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासाठी हे पुरस्कार दिले जातात. पारनेर येथे झालेल्या बैठकीमध्ये पूर्णवाद परिवाराचे प्रमुख विष्णू महाराज पारनेरकर यांनी या पुरस्काराची घोषणा केली. पुरस्कार प्रदान सोहळा मुंबई येथे २५ जानेवारीला होणार आहे, अशी माहिती परिवारातील कार्यकर्ते गणेश गवळी यांनी प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

# अय्यप्पा मंदिरात शास्त्रीय गायन कार्यक्रम संपन्न

नगर : प्रतिनिधी

**सावेडी येथील अय्यप्पा मंदिरा मध्ये ६० दिवसांच्या मंडल महापूजा आणि मकर विल्लकु महोत्सवा निमित्ताने गुरुवारी दि. (२१ नोव्हेंबर) संपन्न झाला.**



वेदांत कुलकर्णी आणि भार्गव देशपांडे यांचे शास्त्रीय आणि उपशास्त्रीय गायन होणार आहे.त्यांना तबला चैतन्य पांचाळ,संवादिनी वेदांत कानडे यांनी साथ संगत केली. यानंतर दीप आराधना, महाआरती, पुष्पाभिषेक, अथर्व पूजा व दर्शन,अर्चना,निरांजन व हरीवरासम नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम झाला.

# कडेकोट बंदोबस्तात मतदान यंत्रे ; २४ तास सशस्त्र पहारा

राज्य राखीव दल व केंद्रीय पोलिसांची नजर

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर-नगर मतदारसंघातील मतदान प्रक्रिया बुधवारी निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर विविध मतदान केंद्रावरील मतदान केंद्रे पारनेर शहरातील सेनापती बापट औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कडोकोट बंदोबस्तात ठेवण्यात आले आहेत. संस्थेबाहेर कडोकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.**



पारनेर-नगर मतदार संघातील ३६६ मतदान केंद्र असून मतदान केंद्रातील मतदान यंत्रे पारनेरच्या तहसिल कार्यालयात जमा करण्यात आल्यानंतर बंदोबस्तामध्ये ती औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात नेण्यात आली. तेथील स्ट्राँग रूममध्ये मतदान यंत्रे ठेवण्यात आल्यानंतर स्ट्राँग रूम सिल करण्यात आली. मतपेटया स्ट्राँगरूममध्ये ठेवण्याची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर विविध उमेदवारांच्या सहया घेण्यात आल्या.

सीसीटीव्ही कॅमेरे तसेच स्ट्राँग रूमच्या सुरक्षिततेबाबत यापूर्वीच जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांनी पडताळणी केली होती. सर्व सुरक्षा व्यवस्था काटेकोरपणे असल्याचीही खातरजमा करण्यात आली. स्ट्राँग रूम असलेल्या औद्योगिक वसाहत केंद्रावर राज्य राखीव पोलीस दल व केंद्रीय राखीव पोलिस दलाचे जवान तैनात होते. पारनेर पोलीस ठाण्याचे कर्मचारीही केंद्राबाहेर तैणात आहेत. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघासाठी भारतीय निवडणूक आयोगाने सुरेंद्र सिंह यांची निरक्षक म्हणून नियुक्ती केली असून सुपे येथील शासकीय विश्रमागृहामध्ये त्यांनी अधिकाऱ्यांकडून मतमोजणी व्यवस्थेचा आढावा घेतला. मतमोजणीसंदर्भातील समस्या किंवा इतर माहितीबाबत त्यांनी समस्यांचे निवारण केले.

# अखंड मशाल पायी ज्योतीचे सोनारीकडे प्रस्थान

पळवे खुर्द येथील अखंड हरिनाम सप्ताहात उत्साह

पळवे खुर्द : प्रतिनिधी

**काळभैरवनाथ जयंती निमित्त सालाबादप्रमाणे यंदाही अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला असून सप्ताहानिमित्त श्री क्षेत्रसोनारी येथून आणण्यात येणाऱ्या ज्योतीचे शुक्रवारी दुपारी मोठया उत्साहात प्रस्थान झाले.**



रविवार दि.१७ नोव्हेंबर रोजी या सप्ताहास प्रारंभ झाला. रविवारी पळवे खुर्द येथील सोमनाथ महाज बारगळ यांचे किर्तन झाले. सोमवार दि.१८ रोजी अंबाजोगाई येथील भागवताचार्य दिपक महाराज मेटे, मंगळवार दि.१९ रोजी खडकी, बीड येथील रामायणाचार्य उध्दव महाराज चोले, बुधवार दि.२० रोजी नातेपुते येथील सागर महाराज बोराटे,गुरूवार दि.२१ रोजी आळंदी देवाची येथील विनोदाचार्य गोविंद महाराज गोरे, शुक्रवार दि.२२ रोजी कारखेल, भगवान गड येथील सुदर्शन महाराज शास्त्री यांची किर्तन सेवा पार पडली.

शनिवार दि.२३ रोजी नाशिक येथील अनिल महाराज तुपे यांचे रात्री १० ते १२ दरम्यान नाथजन्माचे किर्तन होणार आहे तर रविवार दि.२४ रोजी सकाळी ९ ते १२ दरम्यान जळगांव येथील ज्ञानेश्वर महाराज जळकेकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.

### दैनंदिन कार्यक्रम

पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ८ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ११ ते १२ गाथा भजन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, सायंकाळी ७ ते ९ हरिकिर्तन, सायंकाळी ९ नंतर हरिजागर व भजन

### ग्राम प्रदक्षिणा आणि मिरवणूक

श्री क्षेत्र सोनारी येथून शनिवार दि. २३ रोजी अखंड मशाल ज्योतीचे पळवे खुर्द येथे दुपारी दोन वाजता आगमन होणार आहे. त्यानंतर ज्योतीची ग्रामप्रदक्षिणा आणि मिरवणूक सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. अखंड पायी ज्योत सोहळयाचे हे १२ वे वर्ष आहे.

# गोरक्षनाथ गडावर प्रकटदिन उत्साहात संपन्न

भाविक भक्तांनी घेतला दर्शनाचा लाभ



मांजरसुंभा : प्रतिनिधी

**धार्मिक महत्व असलेल्या नगरजवळील मांजरसुंभा येथील गोरक्षनाथ गडावर गोरक्षनाथ प्रकटदिन उत्साहात संपन्न झाला.त्यानिमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले अशी माहिती मंदिराचे अध्यक्ष ॲड. शंकरराव कदम यांनी दिली**

सकाळी महापूजा व अभिषेक नाथभक्त दांपत्याच्या हस्ते करण्यात आली त्यानंतर भागवताचार्य गोरक्षनाथ महाराज देठे,शास्त्री, लोणीकर यांचे कीर्तन झाले.यावेळी अध्यक्ष ॲड शंकरराव कदम, गोरक्षनाथ कदम,जयराम कदम,मारुती कदम,सरपंच जालिंदर कदम व विश्वस्त मंडळ,मांजरसुंभा ग्रामस्थ यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक,नाथभक्त उपस्थित होते. तर दुपारी १२ ते ३ यावेळेत रामदास पठारे,दत्तात्रय भुतकर व नाथभक्ताच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन केले आहे.पहाटेपासून दिवसभर मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी आले होते. तर दिवसभर दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या.

गोरक्षनाथ महाराज देठे यावेळी म्हणाले मच्छिंद्रनाथ भारतभर भ्रमण करीत असे फिरत असता एका घरी भिक्षा मागण्यास गेले. त्या स्त्रीस संतती नव्हती. दारी आलेल्या तेज:पूंज साधूला भिक्षा वाढताना पुत्रप्राप्तीची कामना व्यक्त केली. मच्छिंद्रनाथांने त्या स्त्रीला चिमूटभर भस्म दिले व आशिर्वाद दिला. मुलगा होईल.

सदर स्त्रीने आपल्या शेजारणीला झालेली हकीकत सांगितली पण त्या हसू लागल्याने त्या स्त्रीने ते भस्म शेणाच्या ढिगावर टाकून दिले. बारा वर्षांनी मच्छिंद्रनाथ परत आले व मुलाची चौकशी केली तेव्हा मूल झालेच नाही असे त्या स्त्रीने सांगितले. सर्व हकिकत स्त्रीकडून ऐकून मच्छिंद्रनाथ शेणाच्या ढिगाऱ्याजवळ जाऊन चलो गोरक्ष म्हणून हाक मारली.त्या शेणातून मुलगा प्रगटला व म्हणाला 'आदेश' मग मच्छिंद्रनाथ त्याला घेऊन गेले. तेच गोरक्षनाथ.गोरक्षनाथांचा प्रभाव फक्त नेपाळ व भारतातच नाही तर अरब जगतावरही आहे. कानाला छिद्र पाडण्याची पद्धत गोरक्षनाथांनीच सुरू केली.

# निकालापूर्वीच लंके यांच्या अभिनंदनाचे फलक

लंके यांच्या विजयाची कार्यकर्त्यांना खात्री

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांच्या विजयाचे फलक मतमोजणीपूवच नगर-पुणे महामार्गावर लावण्यात आले असून लंके यांच्या विजयाची त्यांच्या समर्थकांना खात्री आहे.**

सुपे येथील शरद आबा पवार तसेच भाऊ निवडूंगे या खा. नीलेश लंके यांच्या कार्यकर्त्यांनी नगर पुणे महामार्गावर राणी लंके यांच्या अभिनंदनाचे फलक लावत महामार्गावरून जाणाऱ्या प्रवाशांचे लक्ष वेधले आहे.

लोकसभा निवडणूकीमध्ये खा. नीलेश लंके हे उमेदवार असतानाही मतदारसंघातील विविध गावांमध्ये लंके यांच्या अभिनंदनाचे फलक लावण्यात आले होते. त्याच धर्तीवर विधानसभा निवडणूकीमध्येही मतमोजणीपूवच राणी लंके यांच्या अभिनंदनाचे फलक लावण्यात आले आहेत.

खा. नीलेश लंके यांच्याकडे तरूणांची मोठी फळी आहे. हेच उत्साही तरूण लंके यांच्या विविध उपक्रमांमध्ये नेहमीच आघाडीवर असतात. खा. लंके हे दरवष महिलांसाठी मोहटादेवी यात्रोत्सवाचे आयोजन करतात. या उपक्रमासंदर्भातही लंके समर्थक विविध प्रकारची बॅनरबाजी करून हा उपक्रम जनतेपर्यंत पोहविण्याचा प्रयत्न करतात. सोशल मिडियाच्या माध्यमातून विविध रिल्स,गाणी तसेच लंके यांच्या उपक्रमांवर प्रकाश झोत टाकण्यात लंके समर्थक आघाडीवर असतात.




### फटाक्यांची आतिषबाजीही

मतदान संपल्यानंतर अनेक गावांमध्ये लंके समर्थक कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करीत आनंदोत्सव साजरा केला. दरम्यान, सुप्याबरोबरच मतदारसंघातील इतर गावांमध्येही राणी लंके यांच्या अभिनंदनाचे फलक लावण्यात आले आहे.

लोकसभा निवडणूकीमध्ये लंके समर्थक हे तालुक्याबाहेर होते. त्याचा परिणाम लोकसभा निवडणूकीतील मताधिक्क्यावर झाला. त्याचे शल्य लंके समर्थकांना होते. विधानसभा निवडणूकीत मात्र लोकसभा निवडणूकीमध्ये घटलेले मताधिक्य भरून काढण्याचा चंग बांधला होता. गावागावांमध्ये महिनाभर प्रचार यंत्रणा राबवित लंके समर्थकांनी राणी लंके व त्यांचे चिन्ह मतदारांच्या मनावर बिंबवले. महिनाभर केलेल्या प्रचारामुळे आत्मविश्वास दुणावलेल्या लंके समर्थकांनी राणी लंके यांच्या विजयाचे फलक मतमोजणीपूवच लावत आपला आनंद व्यक्त केला आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com